नि.फौ.मा.क्र.२१०/२०२३
सरकार –वि– ज्ञानेश्वर
निशाणी क्रमांक १३

सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची साक्ष शपथेवर सुरू :–

माझे नाव :– निवृत्ती रामकृष्ण बोडखे
वय :– १९ वर्षे, व्यवसाय :– शिक्षण,
राहणार :– बेलोरा, ता.शेगांव जि. बुलढाणा

**सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरू** :–

मी आरोपीला ओळखतो. तो माझे गावात राहतो. मंगला बोडखे माझी मोठी बहीण आहे. दिनांक ०२.११.२०२२ रोजी माझी हरवलेली वगार मृत अवस्थेत बेलोरा येथील मोरगांव डिग्रस रोडच्या कडेला असलेल्या नालीमध्ये दुपारी १२.०० ते १२.३० चे दरम्यान सापडली. ती सर्वात आधी मलाच सापडली. रामकृष्ण बोडखे हे माझे वडील आहे. माझे वडीलांनी मला सांगीतले की, आरेपीने शेतातुन घरी जातांना त्यांना असे म्हटले की मी तुमची वगार संपवलेली आहे व तुम्हाला सुध्दा जिवाने संपवेन. सदर घटनेचा रिपोर्ट माझी बहीण मंगला हिने दिला होता. पोलीस माझे घरी आले त्यानंतर मी पोलीसांना घटनास्थळी घेवुन गेलो व त्यांना घटनास्थळ दाखविले. पोलीसांनी पाहणी करुन वगाराचा रिपोर्ट तयार केला व डॉक्टरांकडे तपासणीसाठी पाठविले. अभिलेखावर वगारीचा पोस्ट मॉर्टम रिपोर्ट दाखल आहे. एका वर्षाआधी आरोपीसोबत शेतामध्ये वादावादी झाली तेव्हापासुन आमचे पटत नव्हते. पोलीसांनी माझी विचारपुस करुन माझे बयाण नोंदविले होते. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे. वगार मेल्यामुळे आमचे नुकसान झाले आम्ही तिला लहानाचे मोठे केले होते.

**उलटतपासणी : आरोपी तर्फे अधिवक्ता श्री.बडगुजर वकील साहेब –**

मी पोलीसांनी नोंदविलेले बयाण वाचले होते. पोलीसांना बयाण देतांना मी असे सांगीतले होते की, माझी हरवलेली वगार मृत अवस्थेत बेलोरा येथील मोरगांव डिग्रस रोडच्या कडेला असलेल्या नालीमध्ये दुपारी १२.०० ते १२.३० चे दरम्यान सापडली, ती सर्वात आधी मलाच सापडली, माझे वडीलांना मला सांगीतले की, आरेपीने म्हटले की, तुम्हाला सुध्दा जिवाने संपवेन, एका वर्षाआधी आरोपीसोबत शेतामध्ये वादावादी झाली तेव्हापासुन आमचे पटत नव्हते, वगार मेल्यामुळे आमचे नुकसान झाले आम्ही तिला लहानाचे मोठे केले होते. सदरील बाबी माझे बयाणात नमुद नाही. त्या का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

फिर्याद देण्यासाठी दुपारी १२.०० ते १२.३० चे दरम्यान माझी मोठी बहीण व तिच्यासोबत माझा लहान भाउ गेला होता. हे म्हणने खरे नाही की माझी बहीण संध्याकाळपर्यंत फिर्याद देण्यास गेली नव्हती. पोलीस दिनांक ०२.११.२०२२ दुपारी ३.०० ते ३.३० चे दरम्यान आले होते. पोलीसांसोबत मी व माझी बहीण घटनास्थळावर गेलो.

**प्रश्न**– दिनांक ०२.११.२०२५ रोजी पोलीसांनी कोणताही पंचनामा केला नाही व तुम्ही घटनास्थळ दाखविले नाही.

**उत्तर**– घटनास्थळ साहेबांना दुस–या दिवशी ११.०० वाजता दाखविले त्यावेळी मी व माझा लहान भाउ हजर होतो.

आरोपीसोबत एक वर्षाआधी झालेल्या वादाची तक्रार मी पोलीसांत दिली होती परंतु पोलीसांनी आरोपीवर कोणतीही कार्यवाही केली नाही. हे म्हणने खरे आहे की, शेतात पिकांची लागवड केलेली असते त्यावेळेस त्यांवर किटकनाशके, तणनाशकांची फवारणी केली जाते. हे म्हणने खरे आहे की, सदर पिके जर जनांवरांनी खाल्ली तर त्यांना विषबाधा होते. साक्षीदार सांगतो की, त्यावेळी पिंकावर फवारणी केलेली नव्हती. हे म्हणने खरे नाही की माझेकडे एक वर्षाची कोणतीही वगार नव्हती तसेच मी व माझी बहीण मिळुन आरोपींविरुध्द खोटी तक्रार दिली व आज रोजी सुध्दा खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास :– काही नाही.

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

MADHURI KEWAL GOTE
Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2025.09.20 15:27:10 +0530

( एम. के. गोटे )
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगांव (कोर्ट नं.२)
दिनांक – २०/०९/२०२५

माझे समक्ष,

MADHURI KEWAL GOTE
Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2025.09.20 15:27:21 +0530

( एम. के. गोटे )
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगांव (कोर्ट नं.२)
दिनांक – २०/०९/२०२५